# श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल, नागपूर.
## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग
## आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धा
## अहवाल २०२२-२३

क्रीडा शिक्षण विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० ते १३ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत 'आंतर महाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धा' २०२२-२३ चे उद्घाटन दादासाहेब धनवटे नगर महाविद्यालयाच्या क्रीडांगणात आयोजित करण्यात आले .

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी नागपूर शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. हरीश राठी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा पदव्युत्तर विभागाच्या समन्वयक डॉ. माधवी मार्डीकर, ज्येष्ठ प्रशिक्षक भाऊ काणे, धनवटे नगर महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. जयनाबादकर, श्रीमती बिंझाणी महिला महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार, उपप्राचार्य डॉ. सुचिता मराठे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे प्राध्यापक पलाश जोशी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. माधवी मार्डीकर यांनी खेळाडू विद्यार्थिनींना खेळाचे महत्त्व सांगून अमूल्य असे मार्गदर्शन केले. डॉ. हरीश राठी यांनीही आपल्या मनोगतातून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. महाविघालयाचे प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार योनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व पुढेही हॉलीबॉल, खो-खो सारखे खेळ आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे १९९७ नंतर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असे त्यांनी नमूद केले व सर्वांचे आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या वेळी टीचर- इन चार्ज डॉ. अपर्णा चौधरी, प्राध्यापक वृंद , शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व विविध महाविदयालयाच्या 'महिला खेळाडू चमू' ही उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. कविता लुटे यांनी केले.

प्राध्यापक
पलाश जोशी
क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

प्राचार्य
डॉ. उज्वल लांजेवार